RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ११, अंक १८०(६)] सोमवार, डिसेंबर २२, २०२५/पौष १, शके १९४७ [पृष्ठे २, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ६०२**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### महसूल व वन विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक २२ डिसेंबर २०२५.

**अधिसूचना**

**नोंदणी अधिनियम, १९०८.**

क्रमांक नोंदणी-२०२/प्र.क्र.२९७/आरएफ.— नोंदणी अधिनियम, १९०८ (१९०८ चा १६) (यात यापुढे ज्याचा निर्देश, “उक्त अधिनियम” असा केला आहे), महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम ७८ च्या खंड (अ) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा, आणि याबाबतीत त्यास समर्थ करण्याऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, संलेखांच्या नोंदणीसाठी कलम ७८ अन्वये तयार केलेल्या आणि शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक नोंदणी १५५८/६७७३१-एन, दिनांक १७ जुलै, १९६१ (यात यापुढे जिचा निर्देश, “उक्त अधिसूचना” असा केला आहे) अन्वये प्रसिद्ध केलेल्या शुल्काच्या तक्त्यामध्ये सुधारणा करीत आहे आणि उक्त अधिनियमाच्या कलम ७९ द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, तो पुढीलप्रमाणे प्रसिद्ध करीत आहेः—

उक्त अधिसूचनेमध्ये,शुल्काच्या तक्त्यातील, अनुच्छेद-एकमध्ये, नोंद ७३ नंतर, पुढील नोंद जादा दाखल करण्यात येईलः-

“**नोंद ७४.—** विकासक आणि कॉ. मीनाक्षीताई साने महिला बिडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्था (यात यापुढे ज्याचा निर्देश “उक्त संस्था” असा केला आहे), यांच्यामध्ये निष्पादित करावयाच्या, जिच्यावर घरे बांधलेली आहेत त्या मौजे कुंभारी, गट क्रमांक ३४९, ३५०, ३५१, ३७०/११अ, ३८९, ४१५ व ५६३ तालुका दक्षिण सोलापूर, जिल्हा सोलापूर येथील जमिनीच्या हस्तांतरणासाठीचे संलेख आणि बिडी कामगारांच्या नावाने उक्त जमिनीवर बांधलेल्या घरांच्या हस्तांतरणासाठीचे संलेख, यावर, कोणतेही नोंदणी शुल्क देय असणार नाही.ः-

**शर्ती :-**

जेव्हा, ही अधिसूचना, **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात** प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापूर्वी, वर नमूद केलेल्या संलेखांसाठी नमूद स्थावर मालमत्तेच्या संदर्भात नोंदणी शुल्क आधीच भरणा करण्यात आले असेल तर त्या बाबतीत, कोणताही परतावा देण्यात येणार नाही.”.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सत्यनारायण बजाज,**
शासनाचे सहसचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 22nd December 2025.

*NOTIFICATION*

Registration Act, 1908.

No. RGN-202/C.R. 297/RF.— In exercise of the powers conferred by clause (*a*) of section 78 of the Registration Act, 1908 (16 of 1908) (hereinafter referred to as "the said Act") in its application to the State of Maharashtra and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby amends the Table of Fees prepared under said section 78 and published under the Government Notification, Revenue and Forests Department, No.RGN.1558/67731-N, dated the 17th July 1961 (hereinafter referred to as "the said Notification") for registration of instruments and publishes the same as required by section 79 of the said Act, as follows, namely :—

In the said Notification, in the Table of Fees, in Article-l, after Note 73, the following shall be added, namely :—

"Note 74 :—No Registration fees shall be payable on the instruments of conveyance executed between the Developer and the Com. Meenakshitai Sane Mahila Bidi Workers Cooperative Housing Society (hereinafter referred to as "the said society") for conveyance of the Lands at Mouje-Kumbhari, Gat Nos. 349, 350, 351, 370/11A, 389, 415, and 563, Taluka South Solapur, District Solapur on which houses are constructed and instruments for transferring houses constructed on the said land in favour of the Bidi Workers.

*Condition* :—

No refund shall be granted where Registration Fee has already been paid in respect of mentioned immovable property for the instruments mentioned above prior to the date of publication of this order in the *Maharashtra Government Gazette*.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SATYANARAYAN BAJAJ,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.